


# POLITICAL GEOGRAPHY TOPIC NO. I

**DR.UBALE GOVARDHAN SUBHASH**
***(M.A. SET,NET,PGD in Geoinformatics, Ph.D.)***
Associate Professor,
Dept. Geography,
Vivekanand College (Autonomous), Kolhapur
Email id- govardhanu84@gmail.com
Mob. No.- +91-8888666195

# INTRODUCTION



# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | राजकीय भूगोल : विषयप्रवेश | १ |
| २. | प्रमुख संकल्पना व राजकीय भूगोलाचे घटक | २५ |
| ३. | भू लष्करी डावपेच विषयक दृष्टीकोन | ५ |
| ४. | भू राजकीय समस्या | |

# १ राजकीय भूगोल : विषयप्रवेश
## (Introduction to Political Geography)

**ऐतिहासिक मागोवा :**

एक शैक्षणिक विषय या नात्याने राजकीय भूगोल (Political Geography) हा नवीन विषय आहे. राजकीय भूगोल ही मानवी भूगोलाची शाखा असल्याने या शाखेचा जन्म मानवी भूगोलाशी जोडला जातो.

मागील विषयांचा मागोवा घेतला तर पूर्वीचे अभ्यासक लष्करी व राजकीय परिणाम यांच्या संबंधाविषयी प्राकृतिक भूगोल राज्य (देश - State), भूप्रदेश (State territories) व राज्य सत्ता (State Power) यांचेशी संबंधित होते. विशेषत: तत्कालीन अभ्यासाची प्रदेशाच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मांच्या अनुषंगाने प्रादेशिक भूगोल (Regional Geography) आणि प्राकृतिक पर्यावरणाचा (Physical Environment) मानवी क्रियावर पडणाऱ्या प्रभावाने पर्यावरण निश्चयवादाशी विचारसंगती होती. ही विचारसंगती इ. स. १८९७ मध्ये जर्मन भूगोलशास्त्रज्ञ फ्रेडरिक रॅटझेल यांनी लिहिलेल्या Politische Geographie ग्रंथातून स्पष्ट होते.

तथापि, विषयाच्या दृष्टिकोनातून पाहता, ॲरिस्टॉटल (ख्रि.पू. ३८३-३२२) च्या नावाचा सुरुवातीचा ग्रीक राजकीय भूगोलशास्त्रज्ञ म्हणून त्याचा उल्लेख करावा लागेल. ॲरिस्टॉटलच्या सुप्रसिद्ध "Polities" या ग्रंथात त्याने आदर्श राज्याची (देश) संकल्पना मांडली होती. त्यात त्याने लोकसंख्या व भूप्रदेशाचे स्वरूप हे राज्याचे महत्त्वाचे घटक मानले होते.

या संदर्भात ग्रीक वैज्ञानिक स्ट्रॅबो (ख्रि.पू. २४ - इ.स.६३) याचा उल्लेख करावा लागेल. स्ट्रॅबोचे राजकीय भौगोलिक दृष्टिकोन ॲरिस्टॉटलपेक्षा भिन्न आहेत. ॲरिस्टॉटलच्या (जो अथेन्सचा होता) दृष्टीने राज्य (देश) लहान आकाराचे, तर स्ट्रॅबोच्या दृष्टीने ते भव्य आकाराचे आहे. कारण, त्यावेळी रोमन साम्राज्य उत्कर्षाच्या शिखरावर होते.

रोमन साम्राज्याच्या ऱ्हासानंतर युरोपमध्ये भौगोलिक अध्ययनाच्या अंधकार युगास (Dark Age) प्रारंभ झाला. हे युग १००० वर्षे राहिले. या काळात राजकीय भूगोलाच्या क्षेत्रात कोणताही विकास झाला नाही. मात्र, त्यावेळी ख्रिश्चन युरोपपेक्षा मुस्लीम जगतात भौगोलिक अध्ययन मोठ्या प्रमाणात सुरू होते. एक मुस्लीम वैज्ञानिक, इब्न खालदूनने (इ.स. १३४२-१४०५) राजकीय भूगोलात मोलाचे कार्य केले.

१६व्या शतकाच्या प्रारंभी भौगोलिक अभ्यासाने मोठ्या प्रमाणात जोर धरला. त्यावेळी बरेच अभ्यासक राजकीय भूगोलाच्या अध्ययनासाठी उद्युक्त झाले. त्यात जी बोडीन (इ.स. १५३०-१५६९), चार्लस् बॅरॉन व डी. मॉंटेस्क्यु (इ.स. १६८९-१७५५) हे प्रमुख होते.

बोडीनने देशाची राष्ट्रीय वैशिष्ट्ये ही हवामान व प्राकृतिक रचनेने निश्चित होतात, असे प्रतिपादन केले. मॉंटेस्क्युने असे प्रतिपादन केले की, थंड हवामान हे स्वातंत्र्य व लोकशाहीला

मोठ्या प्रमाणात अध्ययन होऊ लागले व राजकीय भूगोल ही मानवी भूगोलाची एक स्वतंत्र शाखा म्हणून उदयास आली. २०व्या शतकात या विषयाची व्याप्ती आणखी वाढली.

**राजकीय भूगोल म्हणजे काय?**

**(राजकीय भूगोलाचा अर्थ/व्याख्या)**

राजकीय भूगोल ही मानवी भूगोलाची शाखा आहे. हा अलीकडे विकसित झालेला विषय असला, तरी जगात राज्याचा (देश) अभ्यास अनेक वर्षांपासून होत आहे. त्यामुळे या विषयाच्या अभ्यासकांनी त्याच्या वेगवेगळ्या प्रकारे व्याख्या केल्या आहेत.

राजकीय भूगोल (Political Geography) हे शब्द ज्याप्रमाणे सूचित करतात, त्याप्रमाणे या शब्दांचा अर्थ राजकीय घटकांशी संबंधित आहे. हे घटक (विभाग) आकार व प्रकार याबाबतीत कमालीचे भिन्न असतात. काही बाबतीत हे भौगोलिक व राजकीय घटक वैशिष्ट्यपूर्ण असतात. उदा. ऑस्ट्रेलिया हा देश संपूर्ण खंडव्याप्त आहे, तर ग्रेट ब्रिटन, जपान, क्युबा इत्यादी देश बेटीय आहेत. सामान्यतः राजकीय घटक (विभाग) हे अंशतः व पूर्णतः मानवनिर्मित सरहद्दींनी वेढलेले असतात. अशा देशांच्या सरहद्दींना भौगोलिक आधार नसतो. मात्र, हे भौगोलिक दृष्ट्या महत्त्वाचे होतात. कारण, ते तेथील संस्कृती व लोकांच्या उद्योगाने प्रभावित होतात.

राजकीय भूगोल राष्ट्राराष्ट्रांच्या दरम्यान अन्योन्य प्रक्रियेशी संबंधित असलेला विषय आहे. आपण जेव्हा राष्ट्राराष्ट्रांमधील वादाचा विचार करतो, तेव्हा त्या वादामध्ये भूगोल असलेला दिसून येतो. कारण, प्रत्येक राष्ट्राच्या विविध गोष्टींवर भौगोलिक घटकांचा परिणाम होतो; म्हणून केवळ भूगोलशास्त्रज्ञांनीच नव्हे, तर इतिहासकार, अर्थशास्त्रज्ञ त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय संबंधांचे विशेष अभ्यासक व इतर अभ्यासकांनीही या संबंधांच्या अभ्यासावर भर दिला पाहिजे. राजकीय भूगोल त्यातील विषयांनुसार सर्व अभ्यासकांचा अंतर्गत भाग आहे.

**काही व्याख्या**

राजकीय भूगोलाचा अर्थ समजून घेण्यासाठी खाली काही अभ्यासकांच्या व्याख्या दिल्या आहेत.

१) 'मानवाचे वसतिस्थान असलेल्या पृथ्वीवरील इतर घटकांच्या संबंधाने स्थान व स्थानाच्या विविध राजकीय वैशिष्ट्यांचा अभ्यास', अशी हार्टशोन या तज्ज्ञाने राजकीय भूगोलाची व्याख्या केली आहे.

("The study of the variations of political phenomena from place to place in connection with variations in other features of the earth as the home of man" - Hartshone)

२) फिट्झर्लंडच्या मतानुसार, ''राजकीय भूगोल म्हणजे राज्यांचे (देश) स्वरूप, त्यांचा विस्तार, त्यांच्या संघटनांचा आणि त्यांच्या परस्परसंबंधावरील परिणामांशी आणि भूगोलाच्या स्थितीशी जुळते घेण्याचे अध्ययन होय.''

मानवी भूगोलाच्या सर्वंकष संकल्पनेतील बदलामुळे राजकीय भूगोलाच्या व्याख्येत किंबहुना त्याच्या दृष्टिकोनात बदल झाला; त्यामुळे त्याचे स्वरूप बदलले. हे स्वरूप प्रमुख तीन भागात विभागले आहे.

**१) मानवाच्या राजकीय क्रिया व संघटना आणि नैसर्गिक पर्यावरण यांमधील परस्परसंबंधाचे स्वरूप (The study of the relations between man's political activities and organizations and the natural environment)**

सुरुवातीच्या काळात राजकीय भूगोल हा मानवाच्या क्रिया व संघटना आणि नैसर्गिक पर्यावरण (किंवा पृथ्वीची स्थिती) यांच्यातील परस्परसंबंधांचे अध्ययन करणारा विषय म्हणून ओळखला जात होता. कारण, त्यावेळी याच पद्धतीने राजकीय भूगोलाचे अध्ययन होत होते. त्यावेळी राजकीय भूगोलांतर्गत मानवाच्या क्रिया व संघटना आणि पृथ्वीच्या स्थितीमधील (भौगोलिक परिस्थिती, प्राकृतिक वैशिष्ट्ये, हवामान इत्यादी) संबंध नियंत्रण, प्रभाव, प्रतिकूल किंवा जुळत्या स्वरूपाच्या पद्धतीचे होते. हार्टशोन या शास्त्रज्ञाने राजकीय भूगोलाच्या स्वरूपाच्या याच मुद्यावर भर दिला आहे. समकालीन फ्रेंच भूगोलतज्ज्ञ कँमील व्हॉलॉक्सच्या मते, राजकीय भूगोलाची महत्त्वाची समस्या म्हणजे राजकीय संस्थाचे जीवन, हे काही अंशी नैसर्गिक चौकटीत असते, ज्यात त्यांचा विकास होतो किंवा मृदा, हवा, पाणी हे घटक ज्या पद्धतीने माणसाच्या जीवनाशी संबंधित असतात, त्या पद्धतीने हे घटक माणसाच्या सामुदायिक व राजकीय क्रियांवर प्रभाव टाकतात.

या प्रकारे राजकीय भूगोलाच्या अध्ययनाचे स्वरूप हे मानवाच्या राजकीय क्रिया आणि संघटना यांवर परिणाम करणाऱ्या पृथ्वीवरील परिस्थितीशी संबंधित असे आहे.

**२) क्षेत्रीय स्वरूप (Areal in Nature)**

त्यानंतरच्या काळात भूगोलास स्थानिक भिन्न परिस्थितीनुसार पृथ्वीच्या भूपृष्ठाच्या अध्ययनाचे विज्ञान म्हणून वाढता दृष्टिकोण मिळू लागला. त्याबरोबर राजकीय भूगोलास एक वेगळे विशेष महत्त्व प्राप्त होऊन, या विषयाच्या नवीन व्याख्या होऊ लागल्या. यांत राजकीय घटकांच्या (प्रदेश/क्षेत्र/विभाग) अभ्यासाला प्रारंभ झाला. त्यामुळे राजकीय भूगोलाच्या अभ्यासाचे स्वरूप बदलले. हार्टशोन या शास्त्रज्ञाने प्रतिपादन केल्याप्रमाणे राजकीय भूगोल हे देशातील राजकीय क्षेत्रांचा इतर क्षेत्रांतील वैशिष्ट्यांच्या संबंधातून अध्ययन करणारा विषय आहे.

नंतर हार्टशोनने केलेल्या विधानाचे १९५४ मध्ये पुनरावलोकन करण्यात आले. या व्याख्येतून राजकीय भूगोल म्हणजे क्षेत्रीय भिन्नतेचे व समानतेचे, राजकीय वैशिष्ट्यांच्या अनुषंगाने केलेले परस्परसंबंधाचे अध्ययन असल्याचे स्पष्ट झाले. या क्षेत्रीय भिन्नतेचा अभ्यास प्राकृतिक, जैविक किंवा सांस्कृतिक संबंधाचा असतो.

या प्रकारे पृथ्वीवरील विविध क्षेत्रे (प्रदेश) राजकीय संघटनात्मक म्हणून उदयास आल्याने, राजकीय भूगोलाला क्षेत्रीय (Areal) स्वरूप प्राप्त झाले. सध्या जगात राजकीय भूगोलाचे अध्ययन याच पद्धतीचे, या स्वरूपातून होत असलेले दिसते.

**राजकीय भूगोलाचे विषय -**

राजकीय भूगोलात खालील विषयांचे अध्ययन होते.

१) राज्य व राष्ट्र यांच्या संकल्पना

२) राज्याचे स्थान, स्थिती, आकार व विस्तार

३) राज्याच्या भौगोलिक स्थितीचा राज्यसंस्थेवर होणारा परिणाम

४) सीमा, सरहद्दी व त्यामुळे निर्माण होणारे वाद

५) राज्य, लोकसंख्या व शासन

६) लोकसंख्येचे स्थलांतर, स्थलांतर विषयक धोरण

७) राज्यातील साधनसंपत्ती, तिचा विकास व तिचे सामर्थ्य

८) वाहतूक, दळणवळण


९) विदेशी व्यापार, व्यापारी धोरण

१०) राजधान्यांची ठिकाणे व त्यांची स्थिती

११) राज्याच्या दृष्टीने लष्करी डावपेच व विदेशी धोरण

**व्याप्ती संदर्भात पाऊंडस शास्त्रज्ञाचे मत**

पाऊंडस या शास्त्रज्ञाने राजकीय भूगोलाच्या व्याप्तीची खालील ६ भागांत विभागणी केली आहे





**आकृती क्र. १.१ पाऊंडच्या मते राजकीय भूगोलाची व्याप्ती**

महत्त्वाचा विषय आहे.

## राजकीय भूगोलाचा इतर शास्त्रांशी असलेला संबंध

राजकीय भूगोलात विविध विषयांचा अभ्यास होत असल्याने या विषयाचा इतर शास्त्रांशी संबंध येतो. खाली राजकीय भूगोलाचे काही प्रमुख व महत्त्वाच्या विषयाशी असलेले संबंध दिले आहेत.




आकृती क्र. १.२ राजकीय भूगोल व इतर शाखा (विषय)

**१) राजकीय भूगोल व इतिहास (Ploitical Geography and History) :** राजकीय भूगोल व इतिहास या विषयांचे एकमेकांशी निकटचे संबंध आहेत. इतिहासाच्या अभ्यासातून आपणास निरनिराळ्या भागांतील मानवी संस्कृतीचा इतिहास समजतो. त्याद्वारे गतकालीन राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक या गोष्टीत झालेल्या बदलाची माहिती मिळते; म्हणून राजकीय भूगोलाच्या अभ्यासाला ऐतिहासिक माहितीचे साहाय्य होते. राज्याची (देश) उत्क्रांती, राज्यसंस्था, राज्यप्रणाली व राजकीय परिस्थिती समजून घेण्यास इतिहासाची मदत घ्यावी लागते. या प्रकारे भूतकाळातील राजकीय घटनांची माहिती इतिहासाद्वारे प्राप्त होते, तर इतिहासाला राजकीय भूगोलाचे साहाय्य होते. या प्रकारे हे दोन्ही विषय एकमेकांच्या साहाय्यावर आधारित आहेत. म्हणून या दोन्ही विषयांचे संबंध स्पष्ट करताना 'इतिहासाला गतकाळातील राज्यशास्त्र आणि राजकीय भूगोलाला सद्य काळातील इतिहास', असे म्हणतात. या प्रकारे हे दोन्ही विषय परस्परांशी संबंधित आहेत.

## राजकीय भूगोलातील दृष्टिकोन (पद्धती)
## (Approaches in Political Geography) :

कोणत्याही विषयाच्या अध्यापनात सुसूत्रता असण्यासाठी त्यात काही दृष्टिकोन (Ap-proaches) असतात. या दृष्टिकोनांना अभ्यासपद्धती असेही म्हणतात. राजकीय भूगोलाच्या अभ्यासात विविध दृष्टिकोन जुळले आहेत. हार्टशोन या शास्त्रज्ञाने राजकीय भूगोलाचे सत्ता (Power), ऐतिहासिक (Historical), स्वरूपशास्त्र (Morphological) व कार्यात्मक (Func-tional) असे चार दृष्टिकोन मानले आहेत. काही तज्ज्ञांनी वरील चार दृष्टिकोनांच्या जोडीला वर्तनात्मक (Behavioral) व रचनात्मक (Systematic) असे आणखी दोन दृष्टिकोन सांगितले आहेत. म्हणजेच यात एकूण ६ दृष्टिकोन (पद्धती)आहेत.

**१) सत्ता पृथःकरण दृष्टिकोन (पद्धती)** (The Power Analysis Approach) : राजकीय भूगोलात सत्ताविषयक किंवा शक्ती पृथःकरण दृष्टिकोनाचा उपयोग सामान्यतः बिगर भूगोलतज्ज्ञ करतात. भूगोलात सत्ताविषयक दृष्टिकोनाचा संबंध येत नाही; मात्र राजकीय विभाग (क्षेत्र) राजकीय सत्तेच्या अनुरोधाने स्पष्ट केले जातात; म्हणून राजकीय भूगोलात हा दृष्टिकोन आलेला आहे. या अनुषंगाने राष्ट्रीय शक्ती पाच भागांत विभागली जाते. यात भौगोलिक, आर्थिक, राजकीय, समाजशास्त्रीय व लष्करी शक्ती अंतर्भूत आहेत. राज्य किंवा राज्यांचा गट अथवा देश एक शक्ती (Power) असलेला घटक समजला जातो. यानुसार परस्परसंबंधाचे अध्ययन सत्ताविषयक दृष्टिकोनात (पद्धतीने) होते.

**२) ऐतिहासिक दृष्टिकोन (पद्धती) (Historical Approach) :** भूतकालीन चांगल्या गोष्टी आणि वर्तमान समस्या समजून घेण्यासाठी ऐतिहासिक राजकीय भूगोल प्राचीन काळातील बाबींवर प्रकाश टाकतो. व्हिटलेसी या शास्त्रज्ञाच्या "The Earth and state' या ग्रंथात नॅशनल स्टेटच्या संदर्भात केलेले विवेचन प्राचीन गोष्टीकडे लक्ष वेधणारे आहे. व्हिटलेसी फ्रान्स या देशाची राजकीय प्रगती कशी झाली, या दृष्टिकोनातून त्याकडे पाहतो. या संदर्भात राज्याच्या (देशाच्या) प्रगतीचा क्रम प्राकृतिक (Physical) व सांस्कृतिक (Cultural) पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून पाहिला पाहिजे.

तथापि, सध्या राज्यात (देश) काय आहे? पूर्वी काय होते? हे ऐतिहासिक राजकीय भूगोलाच्या अभ्यासाने स्पष्ट होते. अशा प्रकारे ऐतिहासिक राजकीय भूगोलाचा अभ्यास कोणत्याही सद्य राजकीय घडामोडी वा बाबींच्या बदलाचे व प्रगतीचे स्वरूप पाहण्यास उपयुक्त असतो.

**३) स्वरूप शास्त्रीय दृष्टिकोन (पद्धती) (Morpholigical Approach)** : या दृष्टिकोनान्वये राजकीय विभागांचा (क्षेत्र) अभ्यास, त्यांचे प्रारूप (Pattern) व रचना (Stru-cture) या दोन वैशिष्ट्यांच्या अनुषंगाने होते. प्रारूप हे देश, राज्य वा प्रशासकीय विभागांची मांडणी (Arrangement) दर्शविते, जे स्थान, आकार व आकृती या तीन गोष्टींच्या संदर्भात असते; तर रचना हे लोकसंख्या, आर्थिक विभाग, राजधान्यांची ठिकाणे, सीमा, अविकसित

वादग्रस्त भागाच्या राजकीय घटकांसंबंधीचे वैशिष्ट्य होय. उदा. इटली या देशाचे प्रारूप हे त्या देशाच्या स्थानाने समजते. भूमध्य समुद्राच्या समीपतेमुळे इटलीचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे. इटलीची भूराजकीय रचना (Geopolitical Structure) त्याची लोकसंख्या व आर्थिक गाभा क्षेत्र, राजधानी व सरहद्दीवरून स्पष्ट होते.

अशा प्रकारे राजकीय भूगोलाच्या स्वरूपीय दृष्टिकोनाच्या अभ्यासात राज्याच्या सीमा सरहद्दी, सीमा प्रदेश, राज्याचे स्थान, विस्तार, राजधान्या, लोकसंख्या, आर्थिक गाभा क्षेत्र इत्यादी गोष्टी येतात.

**४) कार्यात्मक दृष्टिकोन (पद्धती) (Functional Approach)** : कार्यात्मक दृष्टिकोनाची संकल्पना हार्टशोन या तज्ज्ञाने मांडली. हा दृष्टिकोन क्षेत्राच्या (प्रदेश) राजकीय घटकांशी संबंधित आहे. प्रत्येक राजकीय भाग हा संघटनेच्या उपभागांत विभागला जातो. या प्रत्येक भागाचे शासकीय कार्य असते. या उपभागांचे इतर भागांशी किंवा बाहेरच्या भागांपेक्षा देशाशी अधिक मजबूत असे शासकीय संबंध हवेत. तसेच, राज्याचे (देश) कार्य योग्य तऱ्हेने चालण्यासाठी उपभागांत ऐक्य पाहिजे. एकसंधता (Unity), सुसूत्रता (संगती) (Coherance), सफलक्षमता (स्थिरता) (Viability) ह्या राज्याच्या ऐक्यासाठी मूलभूत व आवश्यक गोष्टी आहेत. सफलक्षमता (स्थिरता) ही गोष्ट केवळ आर्थिक गोष्टीशी संबंधित नाही, तर आर्थिक व राजकीय डावपेच आणि इतर राज्यांशी (देश) असलेले राजकीय संबंध यांवर अवलंबून आहे. या दृष्टीने राज्याचे (देश) हे कार्य महत्त्वाचे असते.

कार्यात्मक दृष्टिकोनान्वये राज्याचे कार्य नागरिकांसाठी आर्थिक सफलक्षमता व स्थिरता निर्माण करणे होय. या विशिष्ट कार्यास चालना देण्यासाठी विदेशी व्यापाराचे कायदे, त्या संबंधीचे अनुदान इत्यादी गोष्टींचा राज्य अवलंब करते.

राज्याच्या सुरक्षिततेचा विचार करताना राज्याचे राजकीय डावपेच, इतर देशांशी असलेले राजकीय संबंध, करार, लष्करी सामर्थ्य उभारणे व ते वाढविणे इत्यादी कार्यांचा यात समावेश होतो.

राजकीय भूगोलाच्या विविध दृष्टिकोनात कार्यात्मक दृष्टिकोनाला विशेष महत्त्व आहे.

**५) वर्तनात्मक दृष्टिकोन (Behavioral Approach)** : वर्तनात्मक राजकीय भूगोल (Behavioral Political Geography) हे स्वतंत्ररीत्या भिन्न असलेल्या राज्यांच्या (देशांच्या) वर्तनक्रियेच्या अभ्यासाशी संबंधित आहे. कॅसपरेन व मिंघी या शास्त्रज्ञांनी क्षेत्रीय वर्तन (Behavior in space) व त्याचे क्षेत्रीय स्वरूप (Spatial Pattern) या संबंधी पुढील विधान केले आहे. ते म्हणतात, एका राज्याचे वर्तन दुसऱ्याशी सलोख्याचे असते, तर दुसऱ्याचे वर्तन राज्य बळकावण्याचे असते; म्हणून पहिल्याला बचावाचे वर्तन करावे लागते. जसे भारताचे वर्तन पाकिस्तान व चीन विषयी स्नेहाचे आहे; मात्र दोघांचे भारताविषयीचे वर्तन हे आक्रमतेचे आहे. राज्यांची वर्तनात्मक पद्धती (Behavioral method) अनुभव व प्रयोगावर आधारित असते.

# THANKS

